# शिर्डी संस्थानचे कर्मचारी गिरवणार व्यवस्थापनाचे धडे

## विद्यापीठात कार्यालय प्रशासन व्यपस्थापन प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु

नाशिक (प्रतिनिधी):- संस्थेचा विकास साधण्यासाठी माणसांच्या कार्यक्षमतेबरोबरच व्यवस्थापनाचे अत्याधुनिक कौशल्ये अंगीकारणे महत्त्वाचे आहे. कार्यालयीन कामात कर्मचाऱ्याचे स्थान आणि महत्वाकांक्षा यांना शिक्षणाची जोड मिळाल्यास प्रगतीचा आलेख उंचावण्यास निश्चितीच मदत होईल असा विश्वास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. कृष्णकुमार यांनी व्यक्त केला आहे. मुक्त विद्यापीठाने शिर्डी देवस्थान ट्रस्टच्या कर्मचाऱ्यांसाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून "कार्यालय प्रशासन व्यवस्थापन प्रमाणपत्र शिक्षणक्रम" सुरु केला जाणार आहे. या शिक्षणक्रमाचा शुभारंभ कार्यक्रम शिर्डी संस्थानमध्ये नुकताच आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. समाजातील विविध वंचित घटकांना त्यांच्या गरजेनुसार शिक्षण घेता यावे म्हणूनच विद्यापीठ गेल्या बावीस वर्षापासून निरनिराळे दोनशेहून अधिक शिक्षणक्रम यशस्वीपणे राबवीत असल्याचे प्रतिपादन कुलगुरूंनी केले. येथील प्रत्येक कर्मचाऱ्यात मोठ्या आशा आकांक्षा आहेत. शिक्षणामुळे प्रत्येकाला जीवनात प्रगती साधता येईल असे त्यांनी स्पष्ट केले. या शिक्षणक्रमाच्या यशस्वीतेनंतर लवकरच बी.ए. मंदिर व्यवस्थापन आणि एम.ए. मंदिर व्यवस्थापन हे पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणक्रम सुरु करण्याचे प्रस्तावित असल्याचेही कुलगुरूंनी सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिर्डी संस्थानचे विश्वस्त पांडुरंग अभंग हे होते. प्रमुख मान्यवर म्हणून ट्रस्टचे विश्वस्त अशोक खांबेकर, शैलेश कुटे, डॉ. एकनाथ गोंदकर, डॉ. प्यारेलाल तिवारी, र.ग. कर्णिक, सुरेश वाबळे, कार्यकारी अधिकारी किशोर मोरे, उपकार्यकारी अधिकारी डॉ. यशवंत माने, मुक्त विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे, डॉ. दिलीप फडके, डॉ. रामचंद्र तिवारी, डॉ. जयदीप निकम, डॉ. प्रकाश देशमुख आदींसह शिर्डी देवस्थानचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**असा असेल अभ्यासक्रम**

देश-विदेशात आधुनिक तीर्थक्षेत्र म्हणून ख्याती असलेल्या शिर्डी संस्थानचा विस्तार झालेला आहे. संस्थानच्या विविध विभागांमध्ये हजारो कर्मचारी रोज वेगवेगळया कामांत व्यवस्थापनाचे कौशल्य वापरून कामे पार पाडत असतात. दररोज लाखो भाविकांच्या दर्शनाची, प्रसादाची, निवासाची, स्वच्छता, आरोग्य, सुरक्षा, वाहतूक अशा विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या निष्ठेने पार पाडणाऱ्या या कर्मचाऱ्यांना कार्यालयीन प्रशासनाचे व्यवस्थापन कसे असावे याचे काम करता करता शिक्षण घेता येणार आहे. मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. कृष्णकुमार यांनी पुढाकार घेतला असून शिर्डी संस्थानच्या सहयोगातून हा नवीन शिक्षणक्रम सुरु करण्यात आला आहे. सहा महिने कालावधीचा हा प्रमाणपत्र शिक्षणक्रम २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात आला आहे.

**अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये**

या अभ्यासक्रमात कार्यालयीन व्यवस्थापन, कार्यालयाची संकल्पना, कार्यालयाचे महत्त्व, कामे, स्वरूप, कार्यालयीन सेवा साधने व फर्निचर, व्यवस्थापन म्हणजे काय ?, ते कशासाठी करावे लागते ?, कार्यालयीन पत्रव्यवहार व दप्तर

व्यवस्थापन सभा व त्याबद्दलची कामे, कार्यसंस्कृती आणि कार्यालयीन काम, कर्मच्यार्‍यांची वर्तणूक – कार्यप्रेरणा आणि आत्मविश्वास, जनसंपर्क, स्थानिक इतिहास आणि स्थानिक भागाची वैशिष्ट्ये अशा निरनिराळ्या घटकांचा या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. शिवाय संगणकाची नवी कौशल्येही शिकता येणार आहेत. विद्यापीठाच्यावतीने अध्ययन साहित्य व संगणकाचे प्रात्यक्षिक साहित्य पुरविण्यात येणार आहे. या शिक्षणक्रमासाठी शिर्डीच्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात स्वतंत्र अभ्यासकेंद्र सुरु करण्यात आला आहे. येथे प्रत्येक रविवारी संमंत्रकांचे संपर्क होतील. या शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यासाठी २१ फेब्रुवारीपर्यंत मुदत आहे. कर्मचार्‍यांनी अधिक माहितीसाठी प्राचार्य, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय शिर्डी ९४५२५००५३७, विभागीय संचालक डॉ. प्रकाश देशमुख ९४०३७७४५३४, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे संचालक डॉ. दिलीप फडके ९४२२२४९३५४ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

